९५ प्रती

६१

माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची सूची तयार करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन आदेश क्रमांक -केमाअ २००९/५५५/प्र.क्र.३७६/०९/सहा.
दिनांक - १८/०९/२००९.

पहा- केंद्र शासनाच्या मिनीस्ट्री ऑफ पर्सोनेल, पब्लिक ग्रिव्हन्सेस ॲन्ड पेन्शन्स, डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ॲन्ड ट्रेनिंग यांचे क्रमांक - १/१२/२००७- IR, दिनांक ३१/७/२००७ चे कार्यालयीन ज्ञापन

**प्रास्ताविक :-**

द्वितिय प्रशासकीय सुधारणा आयोगाने त्यांच्या अहवालात केंद्र शासनास केलेल्या काही शिफारशी, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत सार्वजनिक प्राधिकरणांची तपशिलवार सूची तयार करण्यासंदर्भातील असून सदर शिफारशी केंद्र शासनाने उपरनिर्दिष्ट कार्यालयीन ज्ञापनान्वये स्विकारल्या आहेत. तसेच सदर कार्यालयीन ज्ञापनात दर्शविलेली कार्यपध्दती अनुसरुन सर्व राज्यांनीही सार्वजनिक प्राधिकरणांची तपशिलवार सूची तयार करण्याचे निदेश सर्व राज्यांना दिलेले आहेत. राज्यात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याच्या दृष्टीने वेळोवेळी राज्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची माहिती घ्यावी लागते. त्यासाठी राज्यातील सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची तपशिलवार सूची संकलित स्वरुपात उपलब्ध असणे आवश्यक ठरते. तथापि शासनाने वेळोवेळी सूचना देवूनही मंत्रालयीन विभाग तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांकडे अद्याप असा तपशिल तयार करण्याचे निदर्शनास येते. परिणामी या अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीचा आढावा घेण्यात अडचणी निर्माण होतात. या व्यतिरिक्त काही अर्जदारांकडून विविध विभाग / कार्यालयांकडे त्यांच्या अधिपत्याखालील सार्वजनिक प्राधिकरणांची / जन माहिती माहिती अधिकाऱ्यांच्या सूचीची मागणी केली जाते व सद्यस्थितीत अशा सूच्या तयार नसल्याने त्या त्यांना पूरविणे शक्य होत नाही, असेही निदर्शनास आले आहे. सार्वजनिक प्राधिकरणांची तपशिलवार सूची तयार करण्याचे दीर्घकालीन महत्व विचारात घेता शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश :-**

(१) प्रत्येक मंत्रालयीन प्रशासकीय विभागाकडे तसेच कार्यालयांकडे त्यांच्या प्रशासकीय विभागाच्या अधिपत्याखाली असणाऱ्या तसेच थेट प्रशासकीय अधिपत्याखाली नसलेल्या मात्र त्या विभागाशी जवळचा संबंध

(कृ.मा.प.)

असणाऱ्या सर्व संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांची तपशिलवार सूची उपलब्ध असणे आवश्यक आहे. त्यामुळे अशी तपशिलवार सुची प्रत्येक प्रशासकीय विभागांनी तसेच त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयांनी दि. १५/१०/२००९ पर्यंत तयार करावी व वेळोवेळी ती अद्ययावत करण्याची करण्याची कार्यवाही करावी. अशा प्रकारे तपशिलवार सूची तयार करण्याच्यादृष्टीने संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांची पुढीलप्रमाणे विगतवारी करण्यात यावी. (१) संविधानाद्वारे किंवा तदन्वये निर्मित झालेली प्राधिकरणे (२) संसद किंवा विधीमंडळाने केलेल्या अन्य कायदयाद्वारे स्थापित प्राधिकरणे (३) सार्वजनिक उपक्रम, (४) समुचित शासनाच्या कार्यकारी आदेशांद्वारे गठीत करण्यात आलेली प्राधिकरणे , (६) शासनाची मालकी, नियंत्रण असलेल्या किंवा मोठया प्रमाणात वित्त पुरवठा केल्या जाणाऱ्या संस्था,(७) शासनाकडून मोठया प्रमाणावर वित्त पुरवठा करण्यात येणाऱ्या अशासकीय संस्था.

वरील विगतवारीनुसार सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची अद्ययावत माहिती संबंधित विभागांनी ठेवणे आवश्यक आहे.

(२) प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाकडे त्यांच्या अधिपत्याखालील सर्वात कनिष्ठ स्तरावरील सार्वजनिक प्राधिकरणांपर्यंतची माहिती असणे आवश्यक आहे व अशा प्रकारे तयार केलेली तपशिलवार सूची संबंधित सार्वजनिक प्राधिकरणांनी वेबसाईटवर प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

(३) वरीलप्रमाणे कार्यपध्दती अनुसरुन सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील / त्यांच्याशी संबंधित असलेल्या कनिष्ट पातळीपर्यंतच्या सर्व सार्वजनिक प्राधिकरणांची सूची तयार केल्याची व वेबसाईटवर प्रसिध्द केल्याची खातरजमा करावी. तसेच अशी सूची प्रत्येक महिन्याच्या शेवटी अद्ययावत करुन अद्ययावतीकरणाचा दिनांकही वेबसाईटवर प्रसिध्द करावा. या व्यतिरिक्त, सदर माहिती सी.डी. स्वरुपात सामान्य प्रशासन विभागाकडे दिनांक ३०/१०/२००९ पर्यंत पाठवाव्यात.

हे आदेश महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर संगणक सांकेतांक क्रमांक २००९०९१८५५७१०००१ वर प्रसिध्द करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( विलास थोरात )
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन.

प्रत :-

मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव
मा.मुख्यमंत्री / मा.उपमुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव / सचिव

--२--

नोट

- लोक प्राधिकारी — माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमामधे लोक प्राधिकाऱ्याच्या संज्ञेत इतरही संस्थांचा समावेश करण्यात आला आहे. या संज्ञेस पात्र होणाऱ्या सर्व संस्थांची यादी प्रत्येक विभागाने स्वत:हून प्रसिध्द करणे अत्यंत आवश्यक आहे.

- माहितीच्या कायद्यांतर्गत स्वयंप्रेरणेनें प्रसिध्द करावयाची माहिती नेहमी अद्ययावत ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी अशा प्रत्येक माहितीच्या बाबतीत प्रसिध्दीची दिनांक दर्शवणे आवश्यक आहे.

- माहीतीच्या अधिकाराच्या अधिनियमात स्वयंप्रेरणेने माहीती प्रसिध्द करणे बंधनकारक आहे. स्वत:हून अशी माहिती प्रसिध्द करण्यासाठी माहीतीचा आवाका लक्षात घेता मोठ्या प्रमाणात संगणकीकरण अपेक्षित आहे. यासाठी प्रत्येक विभागाने संपूर्ण संगणकीकरणासाठी एक कृती आराखडा वेळापत्रकासह तसेच त्यासाठी लागणाऱ्या निधीच्या आवश्यकतेसह तयार करणे अपेक्षीत आहे.

कलम ४ ची खरया अर्थाने अंमलबजावणी होण्यासाठी सर्वप्रथम राज्यातील सर्व लोक प्राधिकारी यांची यादी प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. कोणतीही संस्था जी घटनेनुसार, एखाद्या कायद्यानुसार अथवा नियम किंवा शासकिय आदेशा नुसार स्थापित करण्यात आली आहे अथवा जी शासनाच्या मालकीची किंवा शासनाने नियंत्रीत केलेला अथवा शासनाकडून ज्या संस्थेला पुरेसा निधी प्राप्त होतो आहे अशा सर्व संस्थांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ४ अंतर्गत आपणहून माहिती प्रसिध्द करणे ही यादी प्रत्येक संचालस विभागाकडून प्रसिध्द होणे बंधनकारक आहे.

कलम २ एच नमुना (अ)

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये विभागवार लोकप्राधिकारी यांची यादी.

शासकिय विभागाचे नाव

कलम २ (एच) a/b/c/d

| अनु. क्र. | लोक प्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण / पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

कलम २ एच नमुना (ब)

शासनाकडून पुरेसा निधी प्राप्त लोकप्राधिकारी संस्थांची यादी.

शासकिय विभागाचे नाव

कलम २ (h) (i)(ii) अंतर्गत

| अनु. क्र. | लोक प्राधिकारी संस्था | संस्था प्रमुखाचे पदनाम | ठिकाण / पत्ता |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |